# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय : स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनकिया,
मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०११०७.
दूरध्वनी: 022-28121455 Email ID : tp@mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**नगररचना विभाग**

जा. क्र. मिभा/मनपा/नर/ १२२४/ 2023-2024 दिनांक: ११/७/2023

प्रति,
मा. मुख्य नियोजन अधिकारी
महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा)
6 वा आणि 7 वा मजला, हाउसफिन भवन,
प्लॉट क्र. सी - 21, ई - ब्लॉक,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (ई), मुंबई 400051.
ईमेल - techoff1@maharera.mahaonline.gov.in

**विषय :- राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडुन त्यांच्या नागरी क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांना जारी करण्यात येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे त्यांच्या संकेतस्थळावर तसेच, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) यांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक :- न्यायाप्र-2023/प्र.क्र.13/नवि-20 दि.23/02/2023

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भिय शासन निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्याकडुन त्यांच्या नागरी क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांना जारी करण्यात येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकामी संदर्भिय कळविलेले आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून, तसेच, नियोजन प्राधिकरणांकडून जारी करण्यात येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ती अद्यावत ठेवणे व त्याबाबत शासनाच्या विविध प्राधिकरणांशी समन्वय करण्याचे काम हे सदर प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्र जारी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व नियोजन प्राधिकरणाचे नगररचना विभागातील प्रमुखाचे असेल, असे संदर्भिय शासन निर्णयात नमूद केलेले आहे.

तरी संदर्भिय शासन निर्णयातील आदेशानुसार महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर बांधकाम प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने या पत्रासोबत मिरा भाईंदर

महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांना जारी करण्यात येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे या पत्रासोबत Pen Drive मध्ये soft copy देण्यात येत आहे.

(दिलीप घेवारे)
**प्र. सहायक संचालक, नगररचना**
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत - **कार्यवाहीस्तव**
सिस्टीम मॅनेजर
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
ईमेल - it@mbmc.gov.in

- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांना जारी करण्यात येणारी प्रारंभ प्रमाणपत्रे व भोगवटा प्रमाणपत्रे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

S.PATIL (Le) 2023-07